POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२४७ ● मुंबई, शुक्रवार, १० एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर 'बहु-संस्थात्मक आपत्ती सज्जता सराव' संपन्न

### चक्रीवादळ आणि आपत्कालीन परिस्थितीचा यशस्वी मुकाबला

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

कोणत्याही नैसर्गिक किंवा तांत्रिक आपत्तीचा सामना करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) किती सज्ज आहे, याचे मूल्यमापन करण्यासाठी दोन दिवसीय भव्य 'बहु-संस्थात्मक आपत्ती सज्जता सराव' नुकताच यशस्वीरित्या पार पडला. 'राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (NDMA) आणि 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (DDMA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सरावात केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध यंत्रणांनी आपला सहभाग नोंदवून आपत्कालीन सज्जतेचे दर्शन घडविले.

विमानतळ परिसरात आयोजित या दोन दिवसीय कार्यक्रमाची सुरुवात 'टेबलटॉप सराव' या सत्राने झाली, ज्यामध्ये आपत्तीच्या वेळी करावयाचे नियोजन आणि विविध विभागांमधील समन्वयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यानंतर बचाव कायासांठी उपयुक्त ठरणारी अत्याधुनिक साधने आणि विशेष वाहनांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. या सरावाचा मुख्य भाग म्हणजे 'पूर्ण-स्तरीय प्रात्यक्षिक सराव' (Mock Drill) होय. या माध्यमातून प्रत्यक्ष घटनेच्या वेळी दिला जाणारा प्रतिसाद, लोकांचे सुरक्षित स्थलांतर, शोध व बचाव कार्य, धोक्यांचे व्यवस्थापन आणि आपत्कालीन कृती केंद्रांचे (EOC) कार्यान्वयन या बाबींचे प्रत्यक्ष मैदानावर सूक्ष्म मूल्यमापन करण्यात आले.

या सरावासाठी एक अत्यंत गुंतागुंतीची आणि 'मल्टी-हॅजार्ड' परिस्थिती निर्माण करण्यात आली होती, ज्यामध्ये "चक्रीवादळ, आगीच्या घटना आणि धोकादायक किरणोत्सर्गी पदार्थांची गळती" अशा आव्हानांचा समावेश होता. या कठीण




परिस्थितीत धोक्यांचे नियंत्रण करणे, आगीपासून बचाव, बहुमजली इमारतींमधून नागरिकांचे स्थलांतर करणे, संवाद यंत्रणेची कार्यक्षमता तपासणे, संसाधनांची जुळवाजुळव आणि प्रत्यक्ष घटनास्थळावरील सुरक्षा सुनिश्चित करणे, यांसारख्या कार्यपद्धतींची कठोर चाचणी घेण्यात आली.

दोन दिवस चाललेल्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाच्या दुसऱ्या दिवशी डॉ.दिनेशकुमार अस्वाल आणि मेजर जनरल अजय वर्मा (NDMA) यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या मोहिमेत केंद्र व राज्य शासनाचे विविध विभाग, 'राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल' (NDRF), सशस्त्र दले, 'केंद्रीय राखीव पोलीस दल' (CRPF), 'जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण' (DDMA) आणि 'अणुऊर्जा विभाग' (DAE) यांतील अधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. तसेच नवी मुंबई महानगरपालिका (NMMC), पनवेल महानगरपालिका (PMC), सिडको (CIDCO) आणि 'केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल' (CISF), अग्निशमन दल, नागरी संरक्षण दल, आपदा मित्र, आरोग्य विभाग, प्रसारमाध्यमे यांसारख्या स्थानिक व तांत्रिक संस्थांनीही यात मोलाची भूमिका बजावली.

या सरावादरम्यान तातडीचे वैद्यकीय सहाय्य पुरविण्यासाठी कळंबोली येथील व्हाईट लोटस हॉस्पिटल, वाशीचे फोर्टिस हॉस्पिटल आणि सीबीडी बेलापूर येथील अपोलो हॉस्पिटलची पथके तैनात होती. या व्यापक सरावामुळे विविध संस्थांमधील परस्पर समन्वय अधिक दृढ होण्यास मदत झाली असून यंत्रणेतील संभाव्य त्रुटी शोधणे शक्य झाले आहे. तीव्र हवामान आणि एकापाठोपाठ उद्भवणाऱ्या विविध धोक्यांमुळे निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीच्या आपत्कालीन परिस्थितींना अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी विमानतळाची सज्जता वाढविणे, हा या सरावाचा मुख्य उद्देश होता.

या यशस्वी कार्यक्रमात रायगडचे जिल्हाधिकारी किशन जवळे, NDMA चे सदस्य डॉ. दिनेशकुमार अस्वाल, मेजर जनरल अजय वर्मा, मुख्य सल्लागार (CDRN) डॉ. विनोद कौशिक, अणुऊर्जा विभागाचे सदस्य सचिव (संकट व्यवस्थापन) सरस सेठ, उपसचिव दत्तात्रय कदम, कोकण विभागीय माहिती प्र.उपसंचालक मनोज सानप, पनवेल उपविभागीय अधिकारी पवन चांडक, तहसिलदार श्रीमती भामरे, पनवेल महानगरपालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, CRPF चे समादेशक अमर सिंग, NDRF चे दुसरे समादेशक दीपक तिवारी, स्फोटक नियंत्रक (PESO) अमित कुमार, CISF चे सहाय्यक समादेशक संजय तसेच मंत्रालयातील कक्ष अधिकारी योगिता गवथे आणि प्रकल्प अधिकारी श्रीदत्त कामत, रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक आदी मान्यवरांचा समावेश होता.

या मोठ्या प्रमाणावरील आपत्ती सज्जता सरावाच्या यशस्वी सांगतेमुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिसाद कार्यपद्धती आणि कार्यात्मक सज्जता अधिक प्रबळ झाल्याचे दिसून आले आहे.

## 'रील स्टार' महिला पोलीस बनल्या खंडणीखोर

### पोलीस उपनिरीक्षकासह तिघांवर गुन्हा



■ **पुणे। प्रतिनिधी,**

पुणे शहरातील पोलीस दलालाच भ्रष्ट कारभार समोर आणणारी धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका प्राचार्याला ब्लॅकमेल करत तब्बल 7 लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकासह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे संपूर्ण पोलिस दलात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक अजित बडे, कर्मचारी सुदाम तायडे आणि दामिनी पथकातील कर्मचारी तसेच सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणून ओळखली जाणारी सोनाली हिंगे यांचा समावेश आहे. आरोपींनी संबंधित प्राचायार्ला पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्याची भीती दाखवत पैशांची मागणी केली होती. भीतीपोटी प्राचार्याला तब्बल 7 लाख रुपये उकळल्याची माहिती समोर आली आहे. आरोपी पोलीस हे शाळेत गुड टच बॅड टच प्रशिक्षण द्याला जात होते, या दरम्यान प्राचार्याला हेरून कट रचून हा सगळा प्रकार केला आहे. सध्या अजित बडे हे सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत असून सोनाली हिंगे आणि सुदाम तायडे हे शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नियुक्त आहेत. या प्रकरणातील सर्व आरोपींविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेत कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. या प्रकारामुळे पोलिस दलाच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला असून, अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान समोर आले आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आरोपींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**'रील स्टार' महिला पोलिसाकडून प्राचार्यांचं ब्लॅकमेलिंग, पॉक्सोची केस अन्...**

एक रीलस्टार महिला पोलिस. डॅशिंग आणि जणू सेलिब्रेटीच. जिचे सोशल मीडियावर भरपूर फॉलोअर्स. दामिनी पथकात जबरदस्त असं काम केल्याच्या बातम्याही वॉलवर दिसताहेत. मात्र आता हीच महिला पोलिस एका प्रकरणात अडकलीय. तिच्यासोबत एक पीएसआय आणि आणखी एक पोलिस कर्मचारी देखील आहेत. एका कॉलेजच्या प्राचायार्ला ब्लॅकमेल करत तब्बल 7 लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकासह तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे संपूर्ण पोलिस दलात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक अजित बडे, कर्मचारी सुदाम तायडे आणि दामिनी पथकातील कर्मचारी आणि सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणून ओळखली जाणारी सोनाली हिंगे यांचा समावेश आहे. आरोपींनी संबंधित प्राचार्याला पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून अटक करण्याची भीती दाखवत पैशांची मागणी केली होती. कॉलेजमधील एका अल्पवयीन विद्यार्थीनीला हाताशी धरुन फियार्दी प्राचार्यांच्या विरोधात खोटी तक्रार देण्यास भाग पाडले. पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करुन सदर प्राचार्यांना अटक करण्याची आणि संस्थेच्या बदनामीची भीती दाखवली. आणि तब्बल 7 लाख रुपये उकळल्याची तक्रार करण्यात आलीय. यातील आरोपी पोलीस हे शाळेत गुड टच बॅड टच प्रशिक्षण द्याला जात होते, या दरम्यान कट रचून हा सगळा प्रकार केला असल्याची तक्रार आहे. सध्या अजित बडे हे सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत असून सोनाली हिंगे आणि सुदाम तायडे हे शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नियुक्त आहेत. या प्रकरणातील सर्व आरोपींविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या घटनेची गांभीयार्ने दखल घेत कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. या प्रकारामुळे पोलिस दलाच्या प्रतिमेला मोठा धक्का बसला असून, अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याचे आव्हान समोर आले आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून आरोपींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## स्वयंपाकघरात घुसलेल्या बिबट्याचे यशस्वी रेस्क्यू
## वनविभागाच्या कारवाईमुळे अनर्थ टळला



■ **वेंगुर्ला। प्रतिनिधी,**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील दाभोली गावात एका जखमी बिबट्याने थेट घरात शिरून स्वयंपाकघर गाठल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकारामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दाभोली येथील रहिवासी विवेक जोशी यांच्या घरात हा बिबट्या अचानक शिरला. बिबट्या स्वयंपाकघरात असल्याचे लक्षात येताच विवेक जोशी यांनी प्रसंगावधान राखत घरातील सर्व सदस्यांना सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी घराचे दरवाजे बाहेरून बंद करून तातडीने वनविभागाशी संपर्क साधला.

माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले. बिबट्या जखमी अवस्थेत असल्याने तो आक्रमक होण्याची शक्यता होती. मात्र, वनविभागाच्या पथकाने अत्यंत दक्षतेने जाळीचा वापर करून बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद केले. जेरबंद करण्यात आलेल्या बिबट्याला पुढील उपचारांसाठी वनविभागाच्या ताब्यात घेण्यात आले आहे. भरवस्तीत आणि थेट घरात बिबट्या शिरल्याने ग्रामस्थांमध्ये काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. वनविभागाच्या तत्पर कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला असून ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

**आपला कोटा ५०० कोटींचा...**

नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारांकडून १५ हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी काही हजार कोटींचा निधी प्रत्यक्षात आला आहे. त्यामध्ये आपला कोटा ५०० कोटींचा असल्याचा दावा लाड याने केला आहे. यामध्ये आपण स्वतः ७०० तंबूंचे तसेच ई टॉयलेट अन् साफसफाईचे टेंडरही घेतल्याचा दावा त्याने केला आहे. या कुंभमेळ्यामध्ये नाश्ता आणि जेवणाचे टेंडर १८ कोटींचं असून ते आपल्याला मिळाल्याचा दावा विलास लाडने केल्याचे कथित ऑडिओ क्लिपमध्ये नमूद करण्यात आले आहे. कुंभमेळा केवळ चाळीस दिवसांचा असून त्यामध्ये एवढा खर्च येत नाही, यातून मोठं कमिशन मिळणार असल्याचा दावा विलास लाडने केला आहे.

## हजारो कोटींची टेंडर्स मॅनेज, सर्वांचे कमिशनही 'फिक्स'

### नाशिकमधील प्रस्तावित कुंभमेळा टेंडर्स बाबत लाचखोर अधिकाऱ्याचे धक्कादायक दावे

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होऊ घातलेल्या कुंभमेळ्यासाठीच्या १ हजार २१ प्रकारच्या कामांचे टेंडर मॅनेज करून लोकांना देण्यात येणार आहेत आणि त्यातून आपल्याला कोट्यवधींचे कमिशन मिळणार आहे, असा दावा मंत्रालयात लाच घेताना अटक करण्यात आलेला कक्ष अधिकारी विलास लाड याच्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये करण्यात आला आहे. निधी मंजूर करण्यासाठी मंत्रालयात ६ लाख ३७ हजारांची लाच घेताना लाड याला अटक करण्यात आली. ही बाब आधीच चर्चेत असताना आता त्याच्या ऑडिओ क्लिपने खळबळ माजवली आहे.

विलास लाड याला एसीबीने लाच घेताना रंगेहाथ



पकडल्यानंतर त्याची एक कथित ऑडिओ क्लिप व्हायरल होत आहे. त्यामध्ये तो समोरच्या व्यक्तीला नाशिकच्या कुंभमेळ्यातील टेंडर आणि त्यातील कमिशनबाबत माहिती देताना दिसतोय आणि त्यातून आपल्याला कोट्यवधींचे कमिशन मिळणार असल्याचा दावा करताना दिसतो आहे. संशयित आरोपी आरोपी विलास लाड सध्या कारावासात असल्याने त्याचे फोन संभाषणात केलेले दावे खरे की खोटे याच्या स्पष्टतेबाबत संधीग्तता आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी टेंडर मॅनेज करून झाली आहेत. त्यामध्ये छोट्या अधिकाऱ्यापासून ते मंत्र्यांपर्यंत सर्वांची टक्केवारी फिक्स झाल्याचा दावा विलास लाडने ऑडिओ क्लिपमध्ये केला आहे. ई टॉयलेट पासून साफसफाईची हजारो कामे आहेत, त्यातून लाखो रुपये कमावता येतील असा दावा त्याने केला आहे. तुज्या कुणी ओळखीचे लोक असतील तर त्यांना ही टेंडर देऊयात. असा विश्वास विलास लाडने समोरच्या व्यक्तीला दिला आहे.

## एआय, पोलीस आणि स्त्रियांची लाखोंची फसवणूक

### तोतया पोलीस अटकेत




■ **नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिक जिल्ह्यात तंत्रज्ञानाचा गैरवापर करून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने स्वतःला पोलीस अधिकारी म्हणून सादर करत महिलांना जाळ्यात ओढून आर्थिक लूट करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

**एआय च्या मदतीने बनावट ओळख**

आसिफ तडवी असे आरोपीचे नाव असून, त्याने अकतंत्रज्ञानाचा वापर करून स्वतःचे पोलीस वर्दीतील बनावट फोटो तयार केले होते. हे फोटो इतके वास्तवदर्शी होते की, सोशल मीडियावर पाहणाऱ्या महिलांना तो खरा पोलीस अधिकारी असल्याचा विश्वास बसत होता. इंस्टाग्रामवर सक्रिय राहून तो महिलांशी संपर्क साधत असे.

**प्रेमाच्या जाळ्यात अडकवून लूट**

सिन्नरमधील एका महिलेला त्याने अशाच प्रकारे जाळ्यात ओढले. विश्वास संपादन केल्यानंतर विविध कारणे सांगत त्याने तिच्याकडून सुमारे 3 लाख रुपये उकळले. घरगुती अडचणी आणि पोलीस प्रशिक्षणाच्या नावाखाली पैशांची मागणी केली जात होती. पीडित महिलेने पुढे पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने धमक्यांचा मार्ग अवलंबला. अक च्या मदतीने महिलेचे आक्षेपार्ह फोटो तयार करून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे घाबरलेल्या महिलेने पोलिसांकडे धाव घेतली.

**पोलिसांचा सापळा आणि अटक**

तक्रारीनंतर वावी पोलिसांनी सापळा रचून आरोपीला पकडले. महिलेच्या माध्यमातून भेटण्याचे आमिष दाखवून त्याला बोलावण्यात आले आणि अटक करण्यात आली. आरोपीच्या मोबाईलमधून मोठ्या प्रमाणावर बनावट फोटो, चॅट्स आणि आक्षेपार्ह व्हिडिओ जप्त करण्यात आले आहेत.

**अनेक महिलांची फसवणूक?**

पोलिसांच्या प्राथमिक तपासात आरोपीने अशाच प्रकारे अनेक महिलांना जाळ्यात ओढल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मोबाईलमधील डेटाच्या आधारे पुढील तपास सुरू असून, आणखी पीडित महिला समोर येण्याची शक्यता आहे. नाशिक ग्रामीण पोलिसांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडियावर कोणीही पोलीस असल्याचा दावा करत असल्यास त्याची खातरजमा करणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

एकूणच, तंत्रज्ञानाचा गैरवापर करून फसवणूक करण्याच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज अधोरेखित झाली आहे. या प्रकरणातून डिजिटल सुरक्षा आणि जागरूकतेचे महत्त्व पुन्हा एकदा समोर आले आहे.

## बनावट परवानगीच्या आधारे फ्लॅट विक्री
## प्रकल्प अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

■ **वसई। प्रतिनिधी,**

नालासोपारा पश्चिमेतील सोपारा गाव परिसरात बनावट बांधकाम परवानगीचा वापर करून फ्लॅट विक्री केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी प्रकल्प अधिकाऱ्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नालासोपारा पश्चिमेकडील सोपारा गाव परिसरात बांधकाम क्षेत्राला हादरवणारा प्रकार उघडकीस आला आहे. बनावट परवानगीच्या आधारे सदनिका विक्री केल्याचा आरोप प्रकल्प अधिकारी रामसखा भगवतीप्रसाद यादव याच्यावर करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार फियार्दी यांच्या मालकीची निळेमोरे येथील सुमारे ३६१६ चौरस मीटर क्षेत्रफळाची जमीन विकसित करण्यासाठी आरोपीची २००२ ते २०१६ या कालावधीत प्रकल्प अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्याला ह्यसिद्धी कन्स्ट्रक्शनह्ण या नावाने प्रकल्पासाठी आवश्यक परवानग्या मिळवण्याचे अधिकार देण्यात आले होते.

तक्रारीनुसार, आरोपीने या विश्वासाचा गैरफायदा घेत




सिडको प्राधिकरणाच्या मूळ बांधकाम परवानगीत फेरफार केला. मूळ मंजुरीत ५८ सदनिका आणि २१ दुकाने नमूद असताना बनावट कागदपत्रांमध्ये ७३ सदनिका आणि २१ दुकाने दाखविण्यात आल्याचे उघड झाले आहे.

यानंतर 'सिद्धिविनायक टॉवर' या इमारतीचे बांधकाम करून बनावट परवानगीच्या आधारे फ्लॅटची नोंदणी करण्यात आली आणि ग्राहकांना विक्री करून आर्थिक फायदा घेतल्याचा आरोप आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध विश्वासघात आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे घर खरेदी करणाऱ्या नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली असून बांधकाम प्रकल्पांच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

### छेडछाड व विनयभंग प्रकरणी ६ आरोपी गजाआड, एसआयटी तपास सुरू



**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, शहरात महिलांच्या सुरक्षेला बाधा आणणाऱ्या आणि सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या काही घटना घडल्या होत्या. यामध्ये ८ पीडित महिलांनी दिलेल्या तक्रारींवरून ८ स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच, एका पुरुषाच्या तक्रारीवरूनही १ गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या तक्रारींमध्ये विनयभंग, छेडछाड आणि धार्मिक भावनांना ठेच पोहचवल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिक शहरात गेल्या काही दिवसांत महिलांचा विनयभंग, छेडछाड आणि धार्मिक भावना दुखावल्याच्या गंभीर घटना उघडकीस आल्या आहेत. या प्रकरणाची दखल घेत नाशिक पोलिसांनी मोठी कारवाई केली असून आतापर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा सखोल आणि गतीने तपास करण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे.

**एसआयटीकडून चौकशीचा फेरा**

सहाय्यक पोलीस आयुक्त मिटके यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, "गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तैनात करण्यात आले आहे. हे पथक या सर्व गुन्ह्यांचा तांत्रिक आणि प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे तपास करेल." अटक करण्यात आलेल्या ६ आरोपींची कसून चौकशी सुरू असून, यामागे आणखी कोणाचे हात आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत. यावेळी पोलिसांनी खाजगी संस्था आणि आस्थापनांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. आपल्या कार्यस्थळी काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित आस्थापनांची असेल. महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करणे हे मालक आणि व्यवस्थापनाचे कर्तव्य असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

**महिलांना आवाहनः घाबरू नका, तक्रार करा!**

नाशिक पोलिसांनी महिलांना धीर देताना सांगितले आहे की, जर कोणासोबतही छेडछाड किंवा विनयभंगाचा प्रकार घडत असेल, तर त्यांनी न घाबरता पोलिसांशी संपर्क साधावा. "तक्रार करणाऱ्या महिलेचे नाव आणि ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. गुन्हेगारांना अद्दल घडवण्यासाठी महिलांनी पुढे येणे गरजेचे आहे," असे आवाहन सहाय्यक पोलीस आयुक्तांनी केले आहे. शहरात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल सज्ज असून, अशा प्रकारच्या विकृत कृत्यांकडे दुर्लक्ष केले जाणार नाही, असा सज्जड दमही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# युद्धाला अर्धविराम, पूर्णविराम कधी?



तब्बल 40 दिवसांनंतर आखाती देश, युरोपीय देश आणि आशियाई देशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. यातून अमेरिकी लोकांनाही वगळता येणार नाही. अमेरिका–इस्त्रायल विरुद्ध इराण युद्धाला अल्पविराम मिळाला आहे. तशी घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वेळेप्रमाणे बुधवारी सकाळी ४ वाजता केली आणि सर्वांचा जीव भांड्यात पडला. हा युद्धविराम दोन आठवड्यांचा असला तरी मधल्या काळात दोन्ही बाजूंनी बैठका होतील आणि तोडगा काढण्याचे प्रयत्न केले जातील. तोपर्यंत होर्मुझ सामुद्रधुनीतून इंधनाची जहाजे मार्गी लागतील आणि आशियाई देशांवर त्यातही मुख्यत्वे भारतावर आलेले गॅस संकट काही दिवसांसाठी टळणार आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी सोमवारी इराणला निर्वाणीचा इशारा दिला होता. मंगळवारपर्यंत त्यांनी माघार घेतली नाही तर इराण बेचिराख करण्याची धमकी दिली होती. प्रत्यक्षात तशी वेळ आली नाही. कारण मंगळवारी रात्री उशिरापर्यंत पडद्यामागे बर्‍याच घडामोडी घडल्या आणि इराणने दिलेल्या अटी मान्य करत युद्ध दोन आठवड्यांसाठी थांबवण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली. ट्रम्प यांना इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनीही साथ दिल्यामुळे आखाती देशात पुन्हा शांतता नांदेल अशी अपेक्षा बाळगूया! मुळात हे युद्ध का झाले हेही समजून घ्यायला हवे. इराणच्या अण्वस्त्र कार्यक्रमाला रोखण्यासाठी आणि इराणच्या लष्करी पायाभूत सुविधा नष्ट करण्यासाठी अमेरिकेने इस्त्रायलच्या सहकार्याने हे युद्ध केले. इराणला दोन–तीन दिवसांत गुडघ्यावर आणू, असा त्यावेळी ट्रम्प यांचा दावा होता. पण झाले उलटेच आणि इराणनेच अमेरिकेचे प्रचंड नुकसान केले. अमेरिकेची लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर पाडले, बाजूच्या देशांमधील अमेरिकेचे लष्करी तळ उद्ध्वस्त केले. मुळात युद्धाची गरज नसताना केवळ अहंकारापोटी ट्रम्प यांनी हे युद्ध सुरू केले होते. त्यावेळी युद्ध अमेरिकेने सुरू केले असले तरी शेवट इराण करेल, असे इराणने सुनावले होते. इराणच्या सेनापतींची ही वाणी जवळपास खरी ठरली आहे. कारण ट्रम्प यांच्या या युद्धखोरीमुळे अमेरिकेतील जनता त्यांच्याविरोधात गेली आहे. ट्रम्प यांच्याविरोधात लाखोंच्या संख्येने अमेरिकी लोक रस्त्यावर उतरत आहेत. ही बाब बेदखल करता येणार नाही. त्यामुळे हे थांबवण्यासाठी ट्रम्प यांना निमित्त हवे होते. आता त्यांनी इराणच्या 10 अटी मान्य केल्याचे म्हटले आहे. दुर्सया बाजूला हा युद्धविराम म्हणजे इराणचा मोठा विजय असल्याचे त्यांचे सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी म्हटले आहे. त्याचवेळी खामेनी यांनी पाकिस्तानचे आभार मानले आहेत. इराणकडून पाकिस्तानचे आभार ही बाब भारतासाठी महत्त्वाची आणि चिंताजनक आहे. कारण इराण हा आपला एकेकाळचा मित्र देश होता. भारत इराणकडून डॉलरऐवजी रुपयांमध्ये तेल विकत घेत होता. मात्र, भारताची डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी मैत्री सुरू झाल्यानंतर इराणच्या मैत्रीत बाधा आली. तसेच रशियासोबतही झाले. भारत रशियाकडूनही रुपयाच्या मोबदल्यात तेल खरेदी करत होता. मात्र, ट्रम्प यांनी डोळे वटारल्याने आपण रशियाकडून तेल विकत घेणे बंद केले. यांची मोठी आर्थिक किंमत भारताला मोजावी लागली आहे. त्याहीपेक्षा दोन मित्रदेशांना भारताने गमावले आहे, ही बाब लक्षात घ्यावी लागेल. अमेरिका विरुद्ध इराण युद्धाच्या वेळी इराणने चीन आणि बांगलादेशाची इंधनाची जहाजे थांबवली नव्हती. मात्र, भारताची 24 जहाजे अडकली होती. त्यातील सुरुवातीला दोन, नंतर दोन, अशी जहाजे सोडण्यात आली. म्हणजेच बांगलादेश, चीनला जी वागणूक इराणने युद्धाच्या काळात दिली तशी त्यांनी भारताला दिली नव्हती. याचा अर्थ एकेकाळच्या मित्रदेशाला भारताने गमावल्याचे स्पष्ट झाले आहे. हे युद्ध थांबावे यासाठी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ इराण आणि अमेरिका यांच्यात शस्त्रसंधी करण्यासाठी तसेच आखाती देश आणि चीनच्या सहकार्याने दुव्याचे काम करत होते. त्यांच्या मध्यस्थीला यश आले आहे. विशेष म्हणजे आता दोन आठवड्यांसाठी युद्धविराम असला तरी पुढची बैठक पाकिस्तानमधील इस्लामाबादमध्ये होणार आहे. आता प्रश्न आहे या युद्धाने काय साधले? तर हे युद्ध अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अहंकारामुळे सुरू झाले आणि ते अमेरिकेवर जास्त शेकले. युरोपीय देशांनी युद्धासाठी त्यांचे तळ अमेरिकेला वापरू देणार नाही, असे स्पष्ट सांगितले. शिवाय जे युद्ध दोन–तीन दिवसांत संपवू अशा गमजा ट्रम्प मारत होते ते युद्ध 40 दिवस चालले. एवढेच नाही तर त्यामुळे इराण किती शस्त्रसज्ज आहे, हेही दिसले. यामुळे अमेरिकेची पत ट्रम्प यांनी किती तळागाळात नेली, हे जगाला दिसले. या युद्धात किती नुकसान झाले याचा अधिकृत आकडा अजून प्रसिद्ध झालेला नाही. इराण आणि इस्त्रायलमधील किती सैनिक मारले गेले, किती नागरिकांचा मृत्यू झाला, किती इमारती जमीनदोस्त झाल्या, इंधनाचे किती तळ बेचिराख करण्यात आले याचे आकडे हळूहळू बाहेर येतील, तेव्हा सर्वांना वास्तवाची जाणीव होईल. या युद्धातून कुणी काही कमावले नाही आणि काहीही साध्य झाले नाही. असो, आता युद्धाला अल्पविराम मिळाला आहे मात्र, या युद्धाला पूर्णविराम मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे इस्लामाबादमधील बैठकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

# खरात पंथीय अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार?



अनेक आयएएस आणि आयपीएस अधिकारी खरातच्या संपर्कात, महिला आयएएस अधिकाऱ्याचे भोंदू अशोक खरातशी कनेक्शन, उपजिल्हाधिकाऱ्याचे जमीन व्यवहारात खरातशी लागेबांधे, महसूल खात्यातील अधिकाऱ्यांचेही खरातशी साटेलोटे, पेन ड्राईव्ह मिळवून देण्यात आयपीएस अधिकाऱ्याने केली खरातला मदत, दोन महिला पोलीस अधिकारीही खरातच्या संपर्कात, महिन्याभरातील बातम्यांचे हे मथळे बघता राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेला ताळ्यावर आणण्यासाठी खरात पंथीय अधिकाऱ्यांवर कारवाईची गरज आहे.

खरात आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांची 'अभद्र युती' महाराष्ट्राला कशी लुटून खात होती, ही बाब खरात प्रकरणावरून दिसून येते. खरातचे राजकीय कनेक्शन जगजाहीर झालेच आहे. एकनाथ शिंदेंपासून रुपाली चाकणकर, दीपक केसरकर, बच्चू कडू, सुनील तटकरे, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार ही नेतेमंडळीही खरातच्या संपर्कात होती, हे एव्हाना समोर आलेच आहे. केवळ संपर्क हा गुन्हा नसला, तरी या संपर्कातून काही व्यवहार झाले असतील, तर त्याचा तपास होणे आवश्यक आहे. खरे तर या राजकीय मंडळींचा वचपा त्यांचेच स्पर्धक असलेले नेते काढतील. पण जे सरकारी बाबू खरातच्या दरबारात हजेरी लावायचे त्यांचे काय? यात आयएएस अधिकाऱ्यांपासून आयपीएसपर्यंत सर्वच मंडळी होती. ब्लॅक मनी व्हाईट करण्यासाठी ते खरातकडे जात. आपल्या काळ्या पैशांची खाणच जणू या अधिकाऱ्यांनी खरातकडे गहाण ठेवली होती. हा काळा पैसा सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी खरात बखुबी निभावत होता. इतकेच नव्हे, तर खरातच्या हवाला रॅकेटमध्येही या अधिकाऱ्यांची गुंतवणूक होती, अशी वदंता आहे. अर्थात आजवर या बाबी केवळ चर्चेच्या स्वरूपात असल्या, तरी ज्या अधिर्कायांची नावे संशयित म्हणून पुढे येत आहेत, त्यांची एकूणच गलेलठ्ठ संपत्ती बघता त्यांच्यावरील संशय अधिक गडद होतो. हे अधिकारी पिढीजात श्रीमंत होते का? जरी असतील, तरी त्यांच्या मालमत्तेत इतकी अवाढव्य वाढ कशी झाली? केवळ वेतनातून कोट्यवधींची माया जमवणे अशक्य आहे. त्यासाठी वाममार्गाचा अवलंब करण्यात आला, हे सांगण्यासाठी खरातसारख्या स्वयंघोषित ज्योतिषाची गरज नाही. केवळ खरातच्या संपत्तीचे अवलोकन केले, तरी बर्‍याच प्रश्नांची उत्तरे मिळतात.

खरातची आजवर जी संपत्ती पुढे आली आहे, ती सुमारे दोन हजार कोटींची आहे, असे म्हटले जाते. कुठला ज्योतिषी आपल्या ज्योतिषविद्येतून इतकी संपत्ती कमवू शकतो? खरे तर, ज्यांच्याकडे बक्कळ पैसा आहे, अशा लोकांना हाताशी धरून स्वतःची काही रक्कम टाकून खरात जमिनी खरेदी करत होता. या माध्यमातून काळा पैसा पांढरा करण्याचा त्याचा 'उद्योग' होता. आतापर्यंत समोर आलेल्या 52 सातबारा उर्तायांपैकी 11 प्रकरणात खरातचे स्वतंत्र सातबारा उतारे आहेत. 41 मालमत्ता या सामायिकरित्या खरेदी करण्यात आल्याचे समोर आले आहे. या 41 मालमत्तांपैकी सरकारी बाबूंची किती मालमत्तांमध्ये भागीदारी आहे? इतक्या मोठ्या प्रमाणावर मालमत्ता जमा होत असताना सरकारी यंत्रणा नेमकी काय करत होती? या जमिनी खरेदी प्रकरणात महसूलसह अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग कसा नाकारता येईल? त्यांच्याशिवाय या खरेदी होऊच शकत नाही. खरे तर, आपल्याकडे मालमत्ता खरेदी–विक्री, आर्थिक व्यवहार आणि उत्पन्न यावर लक्ष ठेवण्यासाठी अनेक संस्था आहेत. इन्कम टॅक्स विभाग, सहनिबंधक कार्यालये, बँकिंग प्रणाली, ईडी. या सगळ्या एकमेकांशी जोडलेल्या आहेत. व्यवहारांची नोंद होते, दस्तऐवज तयार होतात, स्टॅम्प ड्युटी भरली जाते. म्हणजेच, एखाद्या व्यक्तीकडे अचानक कोट्यवधींची मालमत्ता जमा होणे अशक्य आहे. तरीही अशी प्रकरणे वर्षानुवर्षे नजरेआड राहतात. खरे तर अशा व्यवहारांकडे दुर्लक्ष करण्याची मोठी 'किंमत' सरकारी बाबूंना मिळते.

जमीन अधिग्रहणाचे बारकावे, कायद्यांतील पळवाटा, नोंदणी प्रक्रियेतील तांत्रिक कंगोरे या सगळ्याचे सखोल ज्ञान असलेले हेच अधिकारी जर संशयित व्यवहारांना हातभार लावत असतील, तर त्या व्यवहारांना कायदेशीरतेचे आवरण मिळवणे काहीच कठीण राहत नाही. या अधिकाऱ्यांच्या मदतीने जमीन खरेदी केल्याच्या संशयाला म्हणूनच बळकटी येते. आयकरात सूट मिळवणे किंवा संस्थांना जमिनी दान स्वरूपात मिळवून काळा पैसा वळविण्याचा हा एक मार्ग आहे. काळा पैसा पांढरा करण्याच्या हेतूने खरातने एक विशिष्ट पद्धत अवलंबल्याचे दिसते. असेच एक प्रकरण समोर आले आहे. 4 मे 2019 ला नरेंद्र हेके यांनी 5 एकर जागा खरेदी केली. या जागेचे मूल्य 16 लाख रुपये दाखवण्यात आले. यापोटी हेके यांनी 24 लाख रुपये मोबदला दिला. खरेदीनंतर दोन तासांत ही जमीन अशोक खरातच्या संस्थेला दान स्वरूपात देण्यात आली, त्यावेळी तिचे मूल्य 32 लाख रुपये दाखवण्यात आले. एखाद्या जमिनीचे मूल्य दोन तासांत दुपटीने कसे वाढू शकते? थोडक्यात काय, तर मंत्रालयातील अधिर्कायांपासून जिल्हाधिकारी, झेडपी सीईओ, पोलीस अधिकारी, महसूल अधिकारी ही सगळी साखळी खरातभोवती फिरत होती.

अभिजीत भांडे पाटील यांसारख्या उपजिल्हाधिकाऱ्यांचे नाव समोर येणे ही बाब अधिक चिंताजनक आहे. खरातच्या मुलीच्या आणि पत्नीच्या नावावर असलेल्या जमिनीमध्ये गुंतवणूक केल्याचा त्यांच्यावर ठपका आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासारख्या संवेदनशील ठिकाणी कार्यरत असलेला अधिकारी जर एका संशयित व्यक्तीच्या जमीन व्यवहारांमध्ये गुंतलेला आढळणे हा संपूर्ण प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार आहे. सरकारने त्यांच्यावर मुळमुळीत कारवाई करत बदलीवर निपटवले आहे. बदली ही कारवाई होऊच शकत नाही. पुरावे सबळ असतील, तर बडतर्फच करणे योग्य ठरते.

मनोज गोहाड यांचे उदाहरण तर आणखी धक्कादायक आहे. अप्पर जिल्हाधिकारी पदावर असताना ते खरातच्या शिवनिका संस्थानचे उपाध्यक्ष होते. एखाद्या सनदी अधिकाऱ्याला अशा संस्थांमध्ये पद धारण करण्याचा अधिकार आहे का? आणि जर नसेल, तर हे इतके दिवस कसे सुरू राहिले? शिवनिका संस्थानची संपत्ती आठ वर्षांत जी 74 पट वाढली, ती अशा अधिर्कायांमुळे तर नव्हे? जातपडताळणी विभागातील एका अधिकाऱ्याचेही खरातकडे नेहमी जाणे–येणे होते. खरातच्या मुलीच्या लग्नात हे महोदय सहकुटुंब उपस्थित होते. इतक्या व्यग्र दिनचर्येतून एखाद्याच्या लग्नाला अधिकारी कधी जातो? जेव्हा त्याचे संबंधिताशी घनिष्ठ संबंध असतात. त्यामुळे लग्नाला जातीने उपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यांचीही चौकशी व्हावी. नाशिकला प्रांत म्हणून काम केलेल्या आणखी एका अधिकाऱ्याचे खरातशी 'व्यवहार' असल्याची चर्चा आहे. त्यासाठी खरात आणि त्याच्या नातेवाईकांच्या जागांची तपासणी करायला हवी. त्याचप्रमाणे खरात प्रकरणी एक वरिष्ठ महिला अधिकारी तपास अधिकाऱ्यांच्या रडारवर आहे.

या महिला अधिकाऱ्याने नाशिकमध्ये पोस्टिंग असताना प्रशासकीय पातळीवर खरातची मदत केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मदतीच्या बदल्यात खरातने आपले नेटवर्क वापरून या महिला अधिकाऱ्याला पसंतीची पोस्टिंग दिल्याचीही चर्चा आहे. प्रशासनातील सर्वोच्च स्तरावर असलेली व्यक्ती जर पोस्टिंगसाठी लॉबिंग करत असेल आणि त्यासाठी महिलांचेच शोषण करणार्‍या संशयित व्यक्तीच्या नेटवर्कचा आधार घेत असेल, तर ती बाब संपूर्ण यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उभा करते. या प्रकरणाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे सिन्नर तालुक्यातील जमिनींचे व्यवहार. दुर्गम भागातील जमिनींची खरेदी करताना संबंधित अधिर्कायाने खरातच्या मध्यस्थीचा वापर केल्याचा संशय आहे. सिन्नर येथील ईशान्येश्वर मंदिरात संबंधित महिला अधिकारी वारंवार हजेरी लावत असत. केवळ दर्शनासाठीच नव्हे, तर तिथे होणाऱ्या विशेष पूजा आणि विधींमध्येही त्यांचा सहभाग असल्याची चर्चा आहे. या भेटींमागे केवळ श्रद्धा होती की काही व्यावसायिक हितसंबंध होते? या दोघांमध्ये काही आर्थिक व्यवहार झालेत का? याची माहिती तपासयंत्रणांनी घ्यावी.

यातून एक गंभीर मुद्दा समोर येतो. तो म्हणजे अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि पोस्टिंगमध्ये खरातचा हस्तक्षेप. आजवरचा अनुभव बघता, उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या नियुक्तीत एकतर मुख्यमंत्र्यांचा हात असतो वा पालकमंत्र्यांचा. पण, नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांची बदली आणि त्यांच्या जागेवर येऊ इच्छिणाऱ्या नवीन अधिकाऱ्याची नियुक्ती ही खरातमुळे रखडली होती. एका अधिकाऱ्यासाठी खरातने तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे शब्द खर्ची केला होता. मात्र ही बाब दुसऱ्या एका अधिकाऱ्याला समजताच त्यानेही या जागेसाठी थेट खरातलाच गळ घातली. खरातसाठी ही बाब 'दोन्ही हात तुपात आणि शिर कढईत' अशी होती. त्यानंतर खरातने एकाच पदासाठी दोन नावे पुढे केल्याने मुख्यमंत्रीही पेचात पडले होते. म्हणजे मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचण्याचा मार्गही खरातच्या दरबारातून होता, याचा अर्थ राजकारण्यांसह प्रशासनाने आपली स्वायत्तता गमावली आहे. बदल्या हा शासनाचा अधिकार असतो, तो निकषांवर आधारित असायला हवा. पण जर तो खरातसारख्याच्या हातात दिला, तर ती व्यवस्था भ्रष्टाचारासाठीच उभी राहणार.

पोलीस यंत्रणेचा सहभागही तितकाच गंभीर आहे. एका वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याने खरातला अश्लील चित्रीकरणाचा पेन ड्राईव्ह परत मिळवून देण्यासाठी मदत केल्याची चर्चा आहे. दोन महिला पोलीस अधिकारीही खरातच्या संपर्कात असल्याचे सांगितले जाते. तसेच शिर्डीतील समता पतसंस्थेतील संशयास्पद खात्यांमध्ये परिवहन विभागातील दोन अधिर्कायांची नावे समोर आली आहेत. ही खाती त्यांनी स्वतः उघडली की त्यांच्या कागदपत्रांचा गैरवापर झाला, हा तपासाचा भाग असला, तरी इतक्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची कागदपत्रे एका संशयित व्यक्तीकडे कशी पोहोचली, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे.

प्रशासन स्वतःची भूमिका विसरले आहे. जनतेचा सेवक असण्याऐवजी, ते सत्तेचे आणि पैशाचे भागीदार बनले आहेत. जेव्हा लोक पाहतात की उच्चपदस्थ अधिकारीच अशा व्यवहारात गुंतलेले आहेत, तेव्हा त्यांच्या मनात कायद्याविषयी आदर राहात नाही. 'सगळेच करतात' ही भावना पसरते आणि भ्रष्टाचार सामान्य बनतो. शिवाय, अधिकारीच अशा व्यक्तींच्या संपर्कात असतात, तेव्हा अंधश्रद्धेला एक प्रकारची 'वैधता' मिळते. या संपूर्ण प्रकरणात प्रामाणिक अधिकाऱ्यांवर मोठा अन्याय होत आहे. ज्यांचा अशोक खरातशी काडीमात्र संबंध नाही, तेच आज संशयाच्या सावलीत उभे केले जात आहेत. लोकांच्या नजरेत 'अधिकारी' हा एकच वर्ग बनतो आणि काहींच्या कृत्यांची शिक्षा सगळ्यांनाच भोगावी लागते. यामुळे प्रामाणिकतेचा आत्मविश्वासच ढासळतो. जर खरंच या स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्यांना न्याय द्यायचा असेल, तर 'सर्वांवर संशय' ही भूमिका नव्हे, तर 'दोषींवर कठोर कारवाई' हा मार्ग स्वीकारावा लागेल. जे खरोखर गुंतलेले आहेत, त्यांना उघडपणे जबाबदार धरणे, त्यांच्यावर ठोस कारवाई आणि कडक शिक्षा करणे हाच त्या निष्पाप अधिकायांची प्रतिष्ठा वाचवण्याचा एकमेव पर्याय आहे.

# नव्या बांगलादेशाचे आकलन



बांगलादेशी समाज आणि लोक, हिंदू आणि मुस्लिम यांच्यातील संबंध आणि ताणतणाव, संस्कृती, तेथील कला आणि चित्रपट, उद्योग यांचाही वेध लेखकांनी पुस्तकात घेतला आहे.

बांगलादेशात फेब्रुवारीमध्ये निवडणूक होऊन तारिक रेहमान यांच्या नेतृत्वाखाली एक स्थिर सरकार सत्तेवर आले आहे. 'बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी'च्या या सरकारची भारताबद्दलची भूमिका ही डॉ. महंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारच्या नेतृत्वापेक्षा वेगळी आणि व्यवहारी असल्याचे दिसत आहे.

डॉ. युनूस यांनी भारताच्या विरोधात आणि पाकिस्तानला अनुकूल अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे भारत आणि बांगलादेश यांच्यातील तणाव वाढला होता; तो आता काहीसा निवळत असल्याची चिन्हे आहेत. मात्र, मुळात बांगलादेशात भारतविरोध का वाढला, तिथे पाच ऑगस्ट, २०२४ रोजी विद्यार्थ्यांचा जो उठाव झाला, त्यामागची नेमकी कारणे कोणती, शेख हसीना यांच्या कालावधीत विकासदर वाढल्यानंतरही त्यांच्याविरोधात लोक संतप्त का झाले, इस्लामी कट्टरतावाद का वाढतोय आणि ज्या देशाशी लढून तो स्वतंत्र झाला त्या पाकिस्तानच्या जवळ का जात आहे, असे प्रश्न या निमित्ताने पडतात. बांगलादेशातील जनता, राजकीय कार्यकर्ते, नेते, पत्रकार, नोकरशहा, कलावंत आदींशी संवाद साधून या प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे, तो दीप हलदर, जयदीप मजुमदार आणि शाहिदुल हसन खोकोन या पत्रकारांनी. या प्रयत्नांचे फलित म्हणजे 'इन्शाल्लाह बांगलादेश'.

हलदर आणि मजुमदार हे भारतीय, तर खोकोन हे बांगलादेशी पत्रकार. हलदर यांनी बांगलादेशातील वाढता मूलतत्त्ववाद अन् हिंदूंच्या विरोधातील अत्याचार यांचा मागोवा घेणारे पुस्तकही लिहिले आहे. मजुमदार हेही बांगलादेशाचे जाणकार. खोकोन हे तर ढाक्यातील प्रथितयश पत्रकार. बांगलादेशाच्या परराष्ट्र धोरणाचे भाष्यकार. हसीना यांच्या शेवटच्या कार्यकाळात ते परराष्ट्र धोरणाबाबत सल्लागारही बनले अन् त्यामुळे पाच ऑगस्टच्या उठावानंतर त्यांना तेथून पलायन करावे लागले. या पत्रकारत्रयींनी नव्या बांगलादेशाचे आकलन या पुस्तकाद्वारे मांडले आहे.

बांगलादेशाकडे भारतीय अजूनही १९७१च्या चष्म्यातूनच पाहतात. पाकिस्तानच्या तावडीतून या देशाची आपण मुक्तता केली, याचा उल्लेख सातत्याने केला जातो. बंगाली भाषिक अस्मिता गडद करून बांगलादेश निर्माण झाला, तरी तिथे धार्मिक कट्टरवादी कधीच संपुष्टात आले नव्हते. बांगलादेशाचे संस्थापक म्हणून 'वंगबंधू' शेख मुजिबूर रेहमान यांचे नाव घेतले जात असले, तरी झिया उर रेहमान यांच्यासह इतरांची भूमिका महत्त्वाची होती. शेख मुजिबूर आणि नंतर त्यांच्या कन्या शेख हसीना यांनी बांगलादेशच्या इतिहासाची केलेली मांडणी आणि त्यांच्या विरोधकांची मांडणी यांत फरक आहे. पाच ऑगस्टच्या उठावाच्या मुळाशी हा फरकही आहे. म्हणूनच या उठावानंतर संतप्त जमावांनी मुजीब यांच्या पुतळ्यांचा विध्वंस करण्यासह त्यांच्या स्मारकारूपी खाणाखुणा पुसण्यासाठी हल्ले केले.

या हल्ल्यांमागील मानसिकता, शेख हसीना या कशा एककल्ली होत गेल्या, जनतेत वाढलेल्या असंतोषाकडे त्यांनी दुर्लक्ष कसे केले, उठावाबद्दलच्या इशाऱ्यांकडे कसे दुर्लक्ष केले, आदींचा तपशील पुस्तकात आहे. मुजीब यांना महानायक करण्याचे आणि विरोधकांना देशद्रोही ठरविण्याचा प्रयत्न हसीना यांनी केला. मुक्तिसंग्रामात भाग घेतलेल्यांच्या वारसांना महत्त्व देतानाच विरोधकांना संधी नाकारण्याचे अन् त्यांना संपविण्याचे राजकारणही त्यांनी खेळले. डॉ. महंमद युनूस यांनी गरिबांच्या उत्थानासाठी केलेले प्रयोग सर्वांना माहीत आहे; त्याबद्दल त्यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकही मिळाले. सुरुवातीला हसीना आणि युनूस यांचे संबंध चांगले होते. मात्र, कालांतराने ते बिघडत गेले आणि मग हसीनांनी त्यांच्यावर खटला भरला. त्या विरोधकांना 'रझाकार' म्हणजे मुक्तिसंग्रामात देशविरोधी कारवाया केलेले असे संबोधत. या साऱ्यांतून हसीनांच्या विरोधातील असंतोष वाढत गेला. याबाबत पुस्तकात विस्ताराने माहिती आहे.

हसीना यांची राजवट उलथवून टाकण्याचा कट देशाबाहेर रचला काय, याचाही ऊहापोह त्यांनी केला आहे. हंगामी सरकारच्या काळातील देशातील वातावरण, हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्यानंतर त्यांच्या 'आवामी लीग'च्या कार्यकर्त्यांची धरपकड आणि कट्टरपंथीयांना मिळालेले मोकळे रान यांचे सोदाहरण दाखले पुस्तकात मिळतात. उठावानंतर खोकोन यांना देशात राहणे धोकादायक बनले. अशा परिस्थितीतून त्यांनी पलायन करून भारतात कसे आले याचे वर्णन चित्तथरारक असेच आहे. एकंदरीत बांगलादेशमध्ये गेल्या काही वर्षांपासून असलेली खदखद आणि तेथील राजकारणाची दिशा समजून घेण्यासाठी हे पुस्तक अतिशय उपयुक्त आहे.

# सत्पात्र आणि अपात्र

राज्यातील सुमारे साडेसातशे शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सरकारी अनुदानास अपात्र ठरवण्याचा निर्णय, हा राज्य सरकारचे आजवरचे धरसोडीचे धोरण, संस्थाचालक व सरकार यांच्यामधील साटेलोटे आणि खासगी शाळांकडे वाढता कल अशा वेगवेगळ्या दुखण्यांचा परिपाक आहे. सरकारने वारंवार संधी देऊनही आवश्यक निकषांच्या पूर्तीत अपयशी ठरलेल्या राज्यातील सव्वातीनशे माध्यमिक शाळा आणि चारशेहून अधिक कनिष्ठ महाविद्यालयांना वेतन अनुदानासाठी कायमस्वरूपी अपात्र ठरवण्यात आले आहे.

या संस्था अडचणीत आल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्यही धोक्यात आले आहे. आता या संस्थांमधील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळांमध्ये सामावून घ्यावे आणि संस्थांनी स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नव्याने मान्यता घ्यावी, असे पर्याय सरकारने ठेवले असले, तरी त्यापैकी किती शाळांची तेवढी क्षमता आहे, हा प्रश्न आहे. सध्याच्या पेचातून योग्य मार्ग काढतानाच यापुढे तरी शाळांच्या मान्यतेबाबत स्पष्ट धोरणाची गरज या निमित्ताने अधोरेखित होते.

शिक्षण सर्वदूर पोहोचविण्यासाठी राज्यात सर्वत्र जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिकांच्या शाळा आहेतच; या सरकारी शाळांच्या जोडीनेच खासगी संस्थांच्या शाळाही आहेत. वाढती विद्यार्थिसंख्या पाहता शाळांची गरज वाढत गेली, तशा खासगी शाळाही वाढत गेल्या. सुरुवातीला खासगी संस्थांना सरसकट अनुदान देण्याचे धोरण होते. कालांतराने वेतनेतर अनुदानावर मर्यादा आणल्या गेल्या आणि पुढे तर अनुदानासाठी पात्रतेच्या अटीही वाढत गेल्या. शाळा सुरू करणाऱ्या बहुतांश संस्थांना शिक्षणाबद्दल आस्था असली, तरी काही संस्था या संस्थाचालकांच्या राजकीय आकांक्षांच्या पूर्ततेसाठीही आहेत. निव्वळ अनुदानासाठी संस्था सुरू करण्याचेही प्रकार झाले.

आज शिक्षण विभागाच्या तरतुदींमध्ये सर्वाधिक वाटा या अनुदानापोटीच खर्च होतो आणि वेतनवाढीमुळे तो खर्चही वाढत जातो. अनुदानाचे ओझे जड झाल्याने विना अनुदानित, पुढे कायमस्वरूपी विना अनुदानित अशी वेगवेगळी धोरणे सरकारने राबवून पाहिली. त्यापैकीच एक म्हणजे प्रारंभी विना अनुदानित संस्था काढणे आणि नंतर या ना त्या मार्गाने सरकारकडून टप्प्याटप्प्याने अनुदान मिळवणे अशी पद्धत सुरू झाली.

यामध्ये राजकीय नेत्यांनी काढलेल्या संस्थांचाही समावेश आहे. अशा संस्थांना अनुदानासाठी काही सरकारी निकष आहेत. त्यामध्ये निर्धारित शैक्षणिक पात्रता असलेल्या प्रशिक्षित शिक्षकांची नियुक्ती, कर्मचारी भरतीच्या आराखड्याचे पालन करणे आदींचा समावेश आहे. त्यांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यात आली. त्यातील काही संस्था वारंवार पाठपुरावा केल्यानंतरही निकषांच्या पूर्ततेत अपयशी ठरल्या. त्या पार्श्वभूमीवर सरकारने ७३६ संस्थांना कायमस्वरूपी अपात्र ठरविले.

शाळांच्या अनुदान धोरणातील अस्पष्टता, त्यातील सातत्याचा अभाव, शाळांना मान्यता आणि अनुदान देणाऱ्या यंत्रणांमधील राजकीय दबाव–हितसंबंध आणि बदलत्या काळात पालकांचा खासगी शाळांकडे वाढता कल अशा बाबींच्या दुष्टचक्रात सध्या शिक्षण अडकले आहे. एकीकडे सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत असून, आपल्या पाल्यांना खासगी आणि शक्यतो इंग्रजी–सेमी इंग्रजी शाळांमध्ये घालण्याचा कल पालकांमध्ये वाढतो आहे.

तेथेही शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के विद्यार्थ्यांचा समावेश करून त्यांचा शैक्षणिक खर्च सरकारी अनुदानातून करण्यात येतो. मात्र सरकारी तिजोरीत खडखडाट असल्याने त्यापोटीचे सुमारे सव्वातीन हजार कोटींचे अनुदानही थकलेले आहे. अशा काळात शाळांना परवानगी मागताना आपण 'आत्मनिर्भर' आहोत, असे चित्र निर्माण केले जाते आणि कालांतराने सरकारी अनुदानासाठी लकडा लावण्यात येतो. मग राजकीय हितसंबंध आणि अन्य गैरप्रकार घडतात आणि अनियमितता असतानाही अनुदानाबाबत निर्णय घेतले जातात. अशा अनेक शाळांमध्ये 'भविष्यात अनुदान सुरू होईल,' या आशेवर शिक्षकांना विनावेतन किंवा तुटपुंज्या वेतनावर राबवून घेतले जाते.

## ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून केरोसीन गायब
# केरोसीन पुरवठ्याची केवळ घोषणाच



**प्रत्यक्षात वितरण नाहीच**
ठाणे जिल्ह्यात एकूण सुमारे २ लाख ६ हजारांहून अधिक शिधापत्रिकाधारक आहेत. यामध्ये पिवळ्या शिधापत्रिकाधारकांची संख्या सुमारे ४८ हजार, केशरी शिधापत्रिकाधारक १.१६ लाख, तर सफेद शिधापत्रिकाधारक सुमारे ४१ हजार इतकी आहे. या सर्वांना केरोसीनचा लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात एकाही भागात नियमित वितरण सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम आणि असंतोष वाढत आहे.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

आखाती देशांतील वाढत्या तणावाचा परिणाम आता थेट सामान्य नागरिकांच्या जीवनावर होताना दिसत आहे. एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर ताण आल्याने केंद्र सरकारने केरोसीनला तात्पुरता पर्याय म्हणून वापरण्याचा निर्णय घेतला असला, तरी ठाणे जिल्ह्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याचे चित्र आहे. एप्रिल महिन्याचा पहिला आठवडा संपत आला तरी जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागांत केरोसीनचा पुरवठा पोहोचलेलाच नाही.

केंद्र सरकारने १२ मार्च २०२६ रोजी राज्यांना अतिरिक्त केरोसीन साठा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार महाराष्ट्रासाठी सुमारे ३७ लाख लिटरहून अधिक केरोसीन मंजूर करण्यात आले असून, त्यापैकी सुमारे ४८ हजार लिटर साठा ठाणे जिल्ह्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. पुरवठा सुरळीत करण्यासाठी जिल्ह्यात चार टँकरद्वारे वाहतूक करण्याची योजना आखण्यात आली होती. मार्च आणि एप्रिल महिन्यात तालुकानिहाय मागणीनुसार वितरण होणार असल्याचेही जाहीर करण्यात आले होते.मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती याच्या उलट असल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागांत अद्याप केरोसिन पोहोचले नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

घरगुती वापरासाठी एलपीजी सिलिंडर सहज उपलब्ध नसलेल्या कुटुंबांसाठी केरोसिन हा महत्त्वाचा पर्याय मानला जातो. अशा परिस्थितीत पुरवठा न झाल्याने स्वयंपाकासह दैनंदिन गरजा भागवताना अडचणी निर्माण होत आहेत.

दरम्यान, गॅस टंचाईमुळे यापूर्वी व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले होते. त्यामुळे हॉटेल व खानावळ व्यावसायिकांनाही मोठा फटका बसला होता. अनेकांनी तात्पुरते व्यवसाय बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. आता केरोसीनही वेळेवर उपलब्ध न झाल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनत असल्याचे चित्र आहे.

जिल्हा पुरवठा विभागाकडून केरोसीन लवकरच उपलब्ध होईल, असे सांगितले जात असले तरी वितरणास होत असलेल्या विलंबामुळे ग्रामीण भागातील नागरिकांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## बँकच्या सेल्स मॅनेजरने ग्राहकांची गोपनीय माहिती विकली




**■वसई। प्रतिनिधी,**


नालासोपारा पश्चिम येथील विवा मार्केट परिसरात बँकिंग क्षेत्राला हादरवणारा प्रकार उघड झाला असून, एका बँकच्या सेल्स मॅनेजरकडून ग्राहकांची गोपनीय माहिती लिक करून लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. नालासोपारा पश्चिमेकडील विवा मार्केट परिसरात फ्रॉड इन्वेस्टीगेशन टीमच्या तपासात एक गंभीर आर्थिक गुन्हा उघडकीस आला आहे. बँकच्या सुरत (गुजरात) शाखेत कार्यरत असलेल्या सेल्स मॅनेजरने ग्राहकांची गोपनीय माहिती गैर मार्गाने वापरल्याचा आरोप आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, ऑक्टोबर २०२५ पासून सुरू असलेल्या तपासात मंगलसिंग भिकाभाई चावडा (३७) यांनी त्यांच्या पदाचा गैरवापर केल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपीने बँकच्या अंतर्गत प्रणाली मधून पर्सनल लोन साठी अर्ज करणाऱ्या ग्राहकांची नावे, मोबाईल नंबर, जन्मतारीख आणि लिंग यासारखी संवेदनशील माहिती बेकायदेशीररित्या मिळवली. ही माहिती त्यांनी बँकेच्या परवानगीशिवाय ''आयएफए सर्विसेस'' या संस्थेला पुरवल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे ग्राहकांच्या गोपनीयतेचा भंग झाला असून बँकेच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे.

तसेच आरोपीने या गैरप्रकारातून आर्थिक फायदा मिळवत सुमारे ५ लाख ७८ हजार ३०० रुपये आपल्या मित्राच्या खात्यात वळविण्याचेही तपासात समोर आले आहे. या प्रकरणात सिद्धार्थ सिद्ध याचाही सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध पुढील तपास सुरू आहे. या प्रकरणामुळे बँकिंग व्यवहारांमधील सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# महापालिकेवर २ लाख ४४ हजार कोटींचे कर्ज... परतफेड कशी करणार?

## स्थायी समितीत काँग्रेसचा सवाल




**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महापालिकेच्या माध्यमातून विविध प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पांसाठी ठेवी मोडून पैसा वापरला जात आहे. मुंबई महापालिकेच्या ठेवीत सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा पीएफचे पैसे, कंत्राटदारांची अनामत रक्कम यांचा समावेश असून, त्यावर या सर्व ठेवींचा डोलारा उभा आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेवर २ लाख ४४ हजार कोटींचे कर्ज असून त्याची परतफेड कशी करणार, असा सवाल काँग्रेसचे गटनेते आश्रफ आजमी यांनी उपस्थित केला. दरम्यान, मराठी नाटक व मराठी चित्रपट मनोरंजन करमुक्त करण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, वसोर्वा-दहिसर-भाईंदर कोस्टल रोड असे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. त्यामुळे या प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी पैसा कुठून आणणार? मुंबई महापालिकेच्या ठेवी मोडून प्रकल्प खर्च भागवण्यात येत आहे. मात्र, या ठेवींत ४५ हजार कोटी पालिकेच्या सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पीएफचे पैसे देणे, कंत्राटदारांची अनामत रक्कम अशा प्रकारच्या ठेवी आहेत. या ठेवी विविध बँकांमध्ये असून त्यावर ५.५० टक्के व्याज मिळते. मात्र, पोस्ट ऑफिसमध्ये ७ टक्के, आरबीआय बाँडमध्ये गुंतवणूक केल्यास ७ टक्के व्याज मिळते. मुंबई महापालिका विविध बँकांमध्ये ठेवी ठेवत असल्याने कमी व्याज मिळत असून, गेल्या १० वर्षांत यामुळे ५ ते ६ सहा हजार कोटींचे नुकसान झाल्याचा आरोप आश्रफ आजमी यांनी केला.

याबाबत २०२२-२६ या कालावधीतील श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

**उत्पन्नवाढीसाठी झोपडपट्टी भागांत ह्यफोटोपासह्ल द्यावेत**

मुंबईची लोकसंख्या १ कोटी २४ लाखांवर पोहोचली आहे. यापैकी ६८ लाख लोक झोपडपट्टी भागात राहतात. मुंबई महापालिकेचे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत मालमत्ता कर आहे. झोपडपट्टी भागात पालिका ह्यफोटोपासह्ल बनवून देत नाही.

सगळ्याच नाही, पण काही लाख लोकांचा फोटोपास बनवून दिला तर मुंबई महापालिकेला वर्षाला ५५२ कोटींचा महसूल प्राप्त होईल. त्यामुळे मुंबई महापालिकेने महसूल वाढीसाठी या गोष्टींचा विचार करावा, अशी सूचना एमआयएमचे नगरसेवक जमीर कुरेशी यांनी केली.

**नाल्यांशेजारील बेकायदा बांधकामे हटवावीत**

नाल्यांशेजारी असलेली बेकायदा बांधकाम पालिकेच्या अखत्यारित हटली पाहिजेत. नालेसफाईच्या कामासाठी डिसेंबर, जानेवारीत निविदा काढल्या पाहिजेत, परंतु नालेसफाई नाही ह्यहात सफाईह्ल होत आहे, असा आरोप त्यांनी यावेळी केला.

**पालिकेच्या जागा देताना १ टक्का भाडेवाढ करावी**

मुंबई महापालिका आपल्या जागा ३० वर्षासाठी भाडेतत्त्वावर देते. मात्र, भाड्याने दिलेल्या जागेवर संबंधित व्यक्ती लग्नासाठी जागा देतो आणि एकावेळी ५० हजार रुपये महसूल प्राप्त करतो. त्यामुळे मुंबई महापालिकेने भाडेतत्त्वावर जागा देताना १ टक्का भाडेवाढ करावी, जेणेकरून मुंबई महापालिकेच्या महसुलात भर पडेल, असेही जमीर कुरेशी म्हणाले.

**मनुष्यबळाची कमतरता**

लेखा परीक्षण व चिटणीस विभागात रिक्त पदे आहेत, असे स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी आपल्या भाषणात नमूद केले आहे. चिटणीस विभागातील शिपाई रात्री उशिरा स्थायी समितीचे प्रस्ताव घेऊन नगरसेवकांच्या घरी येतात. आधीच या विभागात मनुष्यबळाची कमतरता आहे, त्यामुळे आधी लेखा परीक्षण व चिटणीस विभागात रिक्त पदे भरा, अशी सूचना मनसेचे गटनेते यशवंत किल्लेदार यांनी केली. मराठी शाळा वाढीवर भर द्यावा, अशी सूचनाही यशवंत किल्लेदार यांनी यावेळी केली.

## एलईडी मासेमारी बोटींना डिझेल पुरवठा करणाऱ्या मच्छिमार संस्थांची नोंदणी रद्द करणार



**डिझेल पुरवणारे रडारवर**
अवैध मासेमारी करणाऱ्या बोटींना रसद पुरवणाऱ्या मच्छिमार संस्थांना इशारा देताना मंत्री राणे म्हणाले की, ''एलईडी मासेमारी करणाऱ्या बोटींना डिझेलचा पुरवठा काही मच्छिमार संस्थांकडून केला जात असल्याची माहिती समोर आली आहे. या संस्थांमुळेच बंदी असूनही या बोटी समुद्रात शिरकाव करू शकतात. त्यामुळे अशा संस्थांचे रजिस्ट्रेशन रद्द करण्याच्या सूचना दिल्या आहेत. भविष्यात कोणीही असे धाडस करणार नाही, याची खबरदारी मत्स्यव्यवसाय खाते घेईल.''

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात एलईडी मासेमारीवर अधिकृत बंदी असतानाही नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आता राज्य सरकारने कठोर पवित्रा घेतला आहे. एलईडी मासेमारी करणाऱ्या बोटींना डिझेलचा पुरवठा करणाऱ्या मच्छिमार संस्थांना आम्ही हेरले असून, अशा संस्थांची नोंदणी आणि परवाना रद्द करण्याची कारवाई केली जाईल, असा इशारा राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी बुधवारी दिला.

अलिबागच्या आक्षी-साखर येथे ग्रोयान्स बंधारा, जेट्टी, पोहोच रस्ता बांधकाम आणि नौकानयन मागार्तील गाळ काढण्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा नितेश राणे यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते. या प्रसंगी आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर उपस्थित होते.

अलीकडच्या काळात एलईडी मासेमारी बोटींवर केलेल्या धडक कारवाईबाबत विचारले असता राणे म्हणाले, "पारंपरिक मच्छिमारांच्या हक्कावर गदा आणणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ही तर केवळ सुरुवात आहे. एलईडी मासेमारीमुळे आमच्या पारंपरिक मच्छिमारांचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे कारवाई करूनही जर कोणी 'मस्ती' करणार असेल, तर त्यांनी आपल्या बोटी विसरून जावे. अशा बोटींवरून जप्त केलेले सर्व साहित्य आम्ही पूर्णपणे नष्ट करून टाकू", असा इशारा त्यांनी दिला.

## शेतात नेऊन अल्पवयीन मुलीच्या तोंडात फडकं कोंबलं
# चौघांकडून सामुहिक बलात्कार, अश्लील व्हिडीओही बनवला

**व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी आणि तपासाची दिशा**
या अमानुष कृत्यानंतर नराधमांनी केवळ बलात्कारच केला नाही, तर पीडितेचा अश्लील व्हिडीओ देखील बनवला. ही घटना कोणाला सांगितल्यास व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी त्यांनी मुलीला दिली होती, ज्यामुळे पीडिता प्रचंड दहशतीखाली होती. या भीतीमुळे तिने सुरुवातीला काहीही सांगितले नाही, मात्र नंतर तिने आपल्या आईला सर्व आपबीती सांगितली. पीडितेच्या आईने अर्जात नमूद केले आहे की, ग्रामीण स्तरावर पंचायतीमध्ये हे प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करण्यात आला, ज्यामुळे पोलिसांत तक्रार देण्यास विलंब झाला. सिकटी पोलीस ठाण्याचे प्रभारी रोशन कुमार यांनी सांगितले की, 4 युवकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पीडितेची वैद्यकीय तपासणी आणि न्यायालयातील जबाब नोंदवण्यासाठी तिला अररिया येथे पाठवण्यात आले आहे. सध्या पोलीस फरार आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी विविध ठिकाणी छापे टाकत आहेत.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यातून माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आलीये. सिकटी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याचे उघडकीस आले आहे. ही घटना गेल्या 25 मार्च रोजी घडली असून पीडितेच्या आईने शुक्रवारी सिकटी पोलीस ठाण्यात 4 नराधमांविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गावात 23 ते 25 मार्च दरम्यान एका सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते आणि पीडितेचे कुटुंब या कार्यक्रमात सहभागी झाले होते. 25 मार्चच्या संध्याकाळी पीडित मुलगी वैयक्तिक विधीसाठी घराबाहेर पडली असता, 4 युवकांनी तिचे तोंड दाबून तिला जबरदस्तीने मक्याच्या शेतात नेले आणि तिथे तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केला. या घटनेने संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून पोलीस या प्रकरणाचा गांभीयार्ने तपास करत आहेत.

## सेवानिवृत्तीस आलेल्या शिक्षकाकडून तिसरीतील विद्यार्थिनीवर अत्याचार... संतप्त ग्रामस्थांनी मास्तरला चोपला



**■बुलढाणा। प्रतिनिधी,**

महिलांवरील अत्याचाराच्या घटनेनं संताप व्यक्त केला जात असताना, शाळेतील बाल लैंगिक शोषणाच्या देखील घटना सातत्याने समोर येत आहेत. बदलापूर येथील शाळेत घडलेल्या बाल लैंगिक अत्याचार प्रकरणानंतर राज्यभरातून संतापाची लाट उसळली होती. तसेच, अशा आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणीही जोर धरु लागली. मात्र, अद्यापही शाळेत अशा घटना घडत असल्याचं दिसून येत आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या लोणी गवळी गावातील एका प्राथमिक शाळेत असा धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला. त्यानंतर, गावकऱ्यांनी संबंधित शिक्षकाला चांगलाच चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिले.

जिल्ह्याच्या मेहकर तालुक्यातील लोणी गवळी गावातील प्राथमिक शाळेत तिसरीत शिकणाऱ्या एका नऊ वर्षीय विद्यार्थिनीसोबत 58 वर्षीय शिक्षकाने लैंगिक अत्याचार केला. आज सकाळी साडेदहा वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. घटना गावातील नागरिकांना माहीत पडताच शेकडोंचा जमाव शाळेवर चालून गेला. गावातील नागरिक आणि महिलांनी या शिक्षकाला चांगलाच चोप दिला. तात्काळ या घटनेची माहिती डोनगाव पोलिसांना देण्यात आली व पोलिसांनी आरोपी शिक्षक महादेव आत्माराम मानतोडे याला ताब्यात घेतले. मात्र, गावकरी पोलिसांना या शिक्षकाला घेऊन जाण्यास मज्जाव करत होते व गेल्या तीन तासांपासून शाळेत तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं.

दरम्यान, शेवटी पोलिसांनी गावकऱ्यांची समजूत काढत या आरोपी शिक्षकाला डोनगाव पोलीस स्थानकात आणले आहे, सध्या गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे हा नराधम शिक्षक येत्या 31 मे रोजी सेवानिवृत्त होणार आहे. सेवानिवृत्तीला अवघा दीड महिना बाकी असताना आणि वयोवृद्ध असतानाही नराधम शिक्षकाने शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या नात्याला काळिमा फासण्याचं काम केलंय. सध्या जानेफळ पोलीस स्थानकाच्या बाहेर मोठी गर्दी असून शिक्षकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## 35 वर्षीय महिला सरकारी कर्मचाऱ्याचे लैंगिक शोषण, एचआयवी पॉझिटीव्ह सांगूनही नराधम ऐकेना... पीडितेच्या गुप्तांगावर हल्ला



**■ मुंबई। प्रतिनिधी,**

आंध्रा प्रदेशातील पालनाडू जिल्ह्यात एक खळबळ प्रकार उघडकीस आला. गुरुवारी एका 35 वर्षीय महिलेला सरकारी कर्मचाऱ्यावर तिच्याच घरात लैंगिक अत्याचार केल्याचं सांगण्यात येतंय. आरोपीने महिलेला स्कार्फने बांधलं आणि नंतर चाकूने धाक धाकवत तिच्यावर अत्याचार केला. पीडितेनं आपण एचआयव्ही पॉझिटीव्ह असल्याचे सांगितलं.

**आरोपीने लोखंडी सळईने पीडितेच्या गुप्तांगावर हल्ला केला**

या प्रकरणातील संतप्त झालेल्या आरोपीने लोखंडी सळईने तिच्या गुप्तांगावर हल्ला केला. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाली, परंतु सध्या तिचा जीव धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात येतंय. संबंधित प्रकरण गुरुवारी दुपारी ३:३० ते ४:०० च्या सुमारास घडल्याचे सांगण्यात येत आहे. पीडित महिला घरात एकटीच राहत होती.

**चाकू दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार**

आरोपी एक अज्ञात व्यक्ती, पाणी पिण्याच्या बहाण्याने घरात घुसला. त्याने महिलेचा जबरदस्तीने स्कार्फने गळा आवळला, नंतर चाकू दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. पीडितेच्या भाच्याने तिला वारंवार फोन करून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, तेव्हा कुटुंबीय आणि शेजाऱ्यांनी याची माहिती दिली होती.

स्थानिक लोकांनी घटनास्थळी धाव घेतली असता, महिला बेशुद्ध अवस्थेत आढळून आली होती. यानंतर पोलिसांना या घटनेची माहिती कळवण्यात आली. संबंधित प्रकरणात घटनेनं परिसर हादरून गेला.

## घटस्फोट घेणार म्हणून पतीने घेतला सूड... पत्नीचे खासगी फोटो सोशल मीडियावर व्हायरल

**■मुंबई। प्रतिनिधी,**

घटस्फोटासाठी अर्ज केल्यानंतर पत्नीची बदनामी करण्यासाठी तिचे खासगी फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार मुंबईत उघड झाला आहे. या प्रकरणी पोलिसांनी पतीविरोधात गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

पीडित महिला (वय ३१) मूळची राजस्थानची असून सध्या मालाड पूर्व येथे राहत असून ती वढरउ परीक्षेची तयारी करत आहे. तिचा पती पश्चिम रेल्वेत वरिष्ठ विभाग अभियंता म्हणून कार्यरत असून त्याचे कार्यालय वांद्रे पूर्व येथील खार रोड येथे आहे. दोघांचा विवाह २५ नोव्हेंबर २०२० रोजी झाला. ते दोघे गोरेगाव पश्चिम येथे राहत होते.

**विवाहबाह्य संबंधांमुळे वाद**

तक्रारीनुसार, विवाहानंतर काही काळातच पतीचे विवाहबाह्य संबंध असल्याचे महिलेला समजले. यामुळे दोघांमध्ये वारंवार वाद होत होते. अखेर २३ ऑगस्ट २०२४ रोजी ती माहेरी राहायला गेली. त्यानंतर आरोपी तिच्या घरी जाऊन शिवीगाळ करत आत्महत्येची धमकी देत होता. तसेच तिच्यासह कुटुंबाला खोट्या प्रकरणात अडकवण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

**इंस्टाग्राम अकाउंट हॅक करून गैरप्रकार**

यानंतर महिला वेगळी राहू लागली. दरम्यान आरोपीने तिच्या इंस्टाग्राम अकाउंट हॅक करून प्रोफाइलमध्ये बदल केले आणि तिच्याच नावाने तिच्या मित्रांशी संवाद साधला. याला विरोध केल्यावर त्याने तिला बदनाम करण्याची धमकी दिली.

**घटस्फोट अर्जानंतर वाढला त्रास**

महिलेने जून २०२५ मध्ये वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केल्यानंतर आरोपी अधिक आक्रमक झाला. १५ जानेवारी २०२६ रोजी त्याने तिच्या अकाउंटवर आक्षेपार्ह फोटो आणि पोस्ट अपलोड केल्या. तसेच फोनवरून धमक्या देत तिचे आयुष्य उद्धवस्त करण्याची आणि ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

१८ मार्च २०२६ रोजी पुन्हा आरोपीने 'वन-टाइम व्ह्यू' स्वरूपात तिचे खासगी फोटो पोस्ट करून नंतर हटवले. मात्र, तक्रारदार महिलेला ते दुसऱ्या मोबाईलवरून पाहता आले.

**पोलिसांकडून गुन्हा दाखल**

या प्रकारामुळे महिलेची बदनामी झाल्याचा आरोप असून आरोपीने तिच्या मैत्रिणीला आणि मैत्रिणीच्या पतीला अपमानास्पद व्हॉइस मेसेज पाठवले. या तक्रारीच्या आधारे दिंडोशी पोलिसांनी २१ मार्च रोजी भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२), ३५२, ३५६ तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६३, ६६ए आणि ६७अ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.



## अवघ्या 7 वर्षांच्या चिमुरडीसोबत कन्स्ट्रक्शन साईटवर नको ते कृत्य
# ठाण्यात संतापजनक घटना... नराधमाला बेड्या

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ठाण्यातील एका धक्कादायक आणि संतापजनक घटनेने परिसर हादरला आहे. सात वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर बलात्कार झाल्याची घटना उघडकीस आली असून या प्रकरणाने पुन्हा एकदा महिलांच्या आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

ही अमानुष घटना ठाण्यातील एका कन्स्ट्रक्शन साईटवर घडली. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीचे वडील याच बांधकाम साईटवर काम करतात. काही दिवसांपूर्वी तिची आई गावी गेल्याने घरात वडील आणि चार वर्षांची धाकटी बहीण असे तिघेच राहत होते. काल रात्री सात वर्षांची मुलगी एकटी असल्याची संधी साधत आरोपीने तिच्यावर अत्याचार केला.

**मुलगी एकटी असल्याचे लक्षात येताच नराधमाकडून अत्याचार**

धक्कादायक बाब म्हणजे आरोपी अवघ्या दोन दिवसांपूर्वीच त्या साईटवर आला होता. त्याचा भाऊ मात्र अनेक दिवसांपासून तिथे काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. मुलगी एकटी असल्याचे लक्षात येताच आरोपीने तिच्यावर बलात्कार करून घटनास्थळावरून पळ काढला.

**नौपाड पोलिसांकडून आरोपीला अटक**
घटनेची माहिती मिळताच नौपाडा पोलीस तात्काळ सक्रिय झाले. पोलिसांनी तत्परता दाखवत दोन ते तीन पथके रवाना केली आणि काही वेळातच आरोपीला अटक करण्यात यश मिळवले. आरोपी बिहारमधून आल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेमुळे ठाणे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून नागरिकांकडून कठोर कारवाईची मागणी होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मंदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com